# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १३७ वा ❑ शनिवार दि.१२ जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## सामान्यांच्या अन्नधान्याचा प्रश्न अनुत्तरित?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्यं

निकृष्ट दर्जाचं जेवण दिल्याचा आरोप करत शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनमध्ये जोरदार राडा केला. निकृष्ट जेवणं दिल्याचा आरोप करत त्यांनी कॅन्टीनमध्ये कर्मचाऱ्याला मारहाण केली. शिळा भात आणि वास येणारी डाळ दिल्याचा आरोप गायकवाड यांनी केला. त्यांनतर आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये झालेल्या मारहाणीच्या घटनेमुळे चर्चेला उधाण आलं आहे. या राड्यातून काही प्रश्न समोर आले आहेत. आमदार गायकवाड यांच्या जवळ सत्ता असल्याने त्यांनी हा प्रश्न समोर आणत हाणामारी केली.आमदार निवास भोजनात जर निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्या जात असेल तर सामान्य जनतेच्या अन्नधान्याचे काय होत असेल...सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत गोर गरिबांन जे धान्य पुरविल्या जाते..ते उत्कृष्ट दर्जाचे असते का? अनेकदा कीड लागलेले अन्नधान्य वितरण केल्या जाते..शाळांमध्ये मध्यान्ह भोजनातील शिळ्या अन्नाचा प्रश्न अनेकदा समोर आला..तेव्हा कोणता लोकप्रतिनिधींनी आवाज उठविला?

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक वितरण प्रणाली ही गरीब आणि दुर्बल घटकांसाठी अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाची यंत्रणा आहे. पाच लाखांहून अधिक रास्त भाव दुकानांद्वारे अन्नधान्याचे मोफत वितरण केले जात असले तरी, प्रणालीमध्ये अद्याप अनेक त्रुटी आहेत, ज्यामुळे देशाच्या अन्न धोरणावर विपरीत परिणाम होत आहे. इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स च्या अलीकडील अहवालात असे म्हटले आहे की देशातील २८ टक्के अन्नधान्य अपेक्षित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. या गळतीमुळे दरवर्षी २० दशलक्ष टन अन्नधान्य वाया जाते, ज्यामुळे सुमारे ६९,००० कोटी रुपयांचे नुकसान होते. त्यामुळे सार्वजनिक वितरण प्रणालीत व्यापक सुधारणा करण्याची गरज आहे.मात्र

यावर मात्र कोणताही आमदार व खासदार बोलायला तयार नाही.

सार्वजनिक वितरण प्रणालीतील अन्नधान्य अनेकदा निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य आणि अन्नसुरक्षेवर परिणाम होतो. सार्वजनिक वितरण प्रणाली ही सरकारची एक योजना आहे, ज्याद्वारे गरीब लोकांना कमी किमतीत अन्नधान्य मिळते. पण अनेकदा या योजनेत पुरवठा होणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असते, असे दिसून आले आहे

आमदारांना शीळ अन्न दिल्याने संजय गायकवाड यांनी मारहाण केल्याचं दृश्य कुस्तीतील आराखड्यासारखे होते.त्यांनी काही एक विचार न करता टॉवेल व बनियान वर येऊन एका पहिलवानासाखे येऊन कॅन्टीन कर्मचाऱ्यांना मारहाण करू लागले..याचे त्यांना काहीच वाटले नाही..आपण एक लोकप्रतिनिधी आहोत..आपली वागणूक सर्वसामान्य ठिकाणीच नव्हे तर सर्वत्र कशी असायला पाहिजे,याचा थोडा तरी विचार त्यांच्या मनात आला नाही..काही एक विचार न करता..ज्या स्थितीत ते होते त्याच स्थितीत येऊन त्यांनी फौजदारासारखी कर्मचाऱ्याला मारहाण केली. याचा व्हिडीओ देखील समोर आला.

जेवणाचा दर्जा चांगला नसल्याची संजय गायकवाड यांची प्रामुख्याने तक्रार होती. यासाठी चक्क डाळीची एक पिशवी घेऊनच संजय गायकवाड बनियन आणि टॉवेलवर कॅन्टिनमध्ये दाखल झाले आणि कर्मचाऱ्यांना जाब विचारू लागले. एका कर्मचाऱ्याशी बोलता बोलता त्यांनी त्याला मारहाण करायला सुरुवात केली. संजय गायकवाड यांच्या या वर्तनासाठी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई व्हावी, अशी मागणी विरोधकांनी अधिवेशनात केली.

दरम्यान, संजय गायकवाड यांच्यावरील कारवाईबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नसताना संबंधित कॅन्टिन चालकाचा परवाना मात्र रद्द करण्यात आला आहे. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने कॅन्टिनचालकाचा परवाना रद्द करण्याचे आदेश बुधवारी दिले. संजय गायकवाड यांनी कॅन्टिनमध्ये मिळणाऱ्या जेवणाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यामुळे या अन्नाचे नमुने बुधवारी तपासणीसाठी पाठवण्यात आले होते.इतकी तत्परता सामान्यांच्या बाबतीत सरकार दाखवणार काय?

कॅन्टीनचा ठेका एकाच कंपनीकडे का? हा ही प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे.आकाशवाणी आमदार निवासातील कॅन्टीनच्या मालकावर सरकार मेहरबान आहे का, असा प्रश्न देखील या अनुषंगाने उपस्थित केला जात आहे. कारण अंजता कॅटर्स हे अनेक वर्षांपासून ते कॅन्टीन चालवत आहेत. मुदत संपल्यानंतर ही पाच वर्षांपासून हे कॅटर्स का सुरु आहे. त्यामुळे नियमांना बगल देत अनेक वर्षांपासून दक्षिण भारतीय असलेल्या कॅटर्सवर सरकार मेहरबान असल्याचं बोललं जात आहे.

या कॅन्टीनचं कंत्राट 'अजंठा केटरर्स' या कंपनीकडे असून ती गेल्या सात वर्षांपासून हे कॅन्टीन चालवत आहे. याच ठिकाणी कार्यरत असलेल्या योगेश पुर्तन या मॅनेजरला आमदार संजय गायकवाड यांनी मारहाण केल्याची माहिती समोर आली आहे. अजंठा केटरर्सचे मालक जयराम बी. शेट्टी हे मुंबईतील असून त्यांच्या ताब्यात इतरही शासकीय कॅन्टीन कंत्राटे आणि हॉटेल-रेस्टॉरंट व्यवसाय आहेत. आकाशवाणी आमदार निवासाबरोबरच मनोरा आमदार निवासाचे कॅन्टीन कंत्राट देखील अजंठा केटरर्सकडे होतं. २०१८ मध्ये मूळ कंत्राटाची मुदत संपल्यानंतर दोनदा मुदतवाढ देण्यात आली होती, आणि त्यामुळेच अजंठा केटरर्स सातत्याने गेल्या सात वर्षांपासून कॅन्टीन चालवत आहे.

या कॅन्टीनमध्ये काम करणारे कर्मचारी हे काही दक्षिण भारतातून आलेले आहेत, तर काही महाराष्ट्रातील स्थानिक आहेत. यामधील योगेश पुर्तन हा मॅनेजर म्हणून काम पाहत होता. तो मूळचा दक्षिण भारतातील असून, घटनेनंतर त्याला आपल्या गावी पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या प्रकरणी अजूनतरी कॅन्टीन मालकांकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून आमदार संजय गायकवाड यांच्याविरोधात कोणतीही अधिकृत तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाच्या पुढील तपासाची दिशा काय असेल, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल..

एका आमदाराला जर शीळ अन्न दिले तर मग सामान्य माणसांचं काय होत असेल?, असा सवाल संजय गायकवाड यांनी उपस्थित केला. आता हाच प्रश्न सामान्य जनता वितरण प्रणालीतील अन्नधान्याबाबत उपस्थित करत आहे.मात्र या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरित आहे.कारण सामान्य जनतेचा वाली कोण? सामान्य लोकांजवळ सत्ता, पैसा नाही..उलट प्रश्न उपस्थित करताच सामान्यांचा आवाज दाबल्या जातो.







# 'मोरोपंत पिंगळे-द आर्किटेक्ट ऑफ हिंदू रिसर्जन्स' या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**नागपूर** – रामजन्मभूमी आंदोलनाच्या संपर्कात आलेल्यांना मोरोपंत पिंगळे यांच्याविषयी माहिती आहे. मात्र, इतर मोठ्या, शिक्षित लोकांना मोरोपंत माहिती नाहीत. विश्व हिंदू परिषदेचे माजी अध्यक्ष अशोक सिंगल या आंदोलनात होते हेच लोकांना माहिती आहे. मात्र, रामन्मभूमी आंदोलन आणि रथयात्रेचे नियोजनही मारोपंतांनी केले होते, असे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले.

आणिबाणीनंतरच्या काळात विरोधक एकत्र आले तर सरकार येऊ शकते, अशी चर्चा सुरू होती. मात्र, आमची त्यावेळीची परिस्थिती अमानत रक्कम जमा होण्याची होती. मात्र,



मोरोपंत पिंगळे यांनी २७६ जागा येण्याचे भाकीत केले होते. निवडणुकांसाठी काम केले मात्र, निकालाच्या दिवशी ते कधीच श्रेय घ्यायला समोर येत नसत असेही डॉ. भागवत म्हणाले.

साप्ताहिक विवेक निर्मित आणि मंदार मोरोणे व प्रांजली काणे लिखित 'मोरोपंत पिंगळे-द आर्किटेक्ट ऑफ हिंदू रिसर्जन्स' या पुस्तकाचे प्रकाशन सरसंघचालकांच्या हस्ते करण्यात आले. वनामती सभागृह झालेल्या या कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक चौगुले, प्रकाश ढोका, राहुल पठारे, संतोष पिंगळे, रवींद्र गोळे उपस्थित होते. मोरोपंत पिंगळे यांचे डोंगराएवढे काम असले तरी लोकांमध्ये त्यांचा डंका वाजला नाही. तशी खडतर साधना त्यांनी लहानपणापासून केली होती. डोंगराएवढे कर्तुत्व असूनही सर्व संघासाठी इतकाच भाव त्यांच्यात होता. रामजन्मभूमी आंदोलनामध्ये अशोक सिंगल यांचे नाव लोकांना माहिती आले. कारण ते पुढे होते. नियोजनामध्ये सिंगल हे पुढे राहतील असेच ठरले होते. मोरोपंतांनाही पुढे राहता आले असते. पण, तशी योजना नव्हती. या संपूर्ण आंदोलनाचे प्रणेता तुम्ही आहात असा प्रश्न मोरोपंतांना केला असता, त्यांनी सहज श्रेय नाकारत सिंगल यांच्याकडे बोट दाखवले, असेही डॉ. भागवत म्हणाले.

रामजन्मभूमी आंदोलनाच्या काळामध्ये पुरावे मांडण्याचे काम सुरू होते. यावेळी आपसात चर्चा सुरू असताना या जागेवर एक मंदिर होते हे ठामपणे मांडण्याचे कामही मोरोपंत करत होते, असेही सरसंघचालक म्हणाले. हिमालयासारखे कर्तुत्व संघाच्या चरणी शरण असे स्वयंसेवकाचे जीवन असले पाहिले. तोच वस्तुपाठ मारोपंत पिंगळे यांच्या पुस्तकातून घ्यावा, असे आवाहनही डॉ. भागवत यांनी केले. यावेळी पुस्तकाचे लेखक मंदार मोरोणे व प्रांजली काणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## डिजिटल मिडिया परिषदेचा सप्टेंबरमध्ये संभाजीनगरात राज्यव्यापी मेळावा

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**मुंबई** – डिजिटल मिडियात कार्यरत असलेल्या पत्रकारांचा पहिला राज्यव्यापी मेळावा १४ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजीनगर येथे होत असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी दिली. मेळाव्याचे उद्घाटन राज्यातील पत्रकारांचे नेते एस.एम.देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचा एक उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेचा विस्तार राज्यभर झपाट्याने होत आहे. राज्यातील ३० जिल्ह्यात डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या आहेत. सर्वांना एका धाग्यात बांधण्यासाठी एक राज्यव्यापी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात राज्य कार्यकारिणीची घोषणा होणार असून उत्कृष्ट युट्यूब चॅनल आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

दोन सत्रात होणाऱ्या या मेळाव्यात व्यावसायिक पध्दतीने चँनल कसे चालवावे, त्यातून महसूल कसा उभा करावा, या संबंधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. मेळाव्याचे स्थळ आणि अन्य माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

राज्यातील युट्यूब, पोर्टलच्या संपादकांनी मेळाव्यास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहनही मिलिंद अष्टीवकर आणि अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## प्रत्येक शाळेत मराठी शिकविणे बंधनकारक -शालेय शिक्षण मंत्री

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**मुंबई** – शाळा अनुदानित असो वा विनाअनुदानित, सरकारी असो वा खासगी तेथे मराठी विषय शिकवलाच गेला पाहिजे. प्रत्येक शाळेत मराठी भाषा बंधनकारक आहे. प्रत्येक शाळेत त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. शाळा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये (सीबीएसई) राज्यभाषा मराठी शिकविणे अनिवार्य आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास शिकविणे देखील बंधनकारक आहे. सर्व शिक्षकांनी याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रत्येक शाळेत राष्ट्रगीतानंतर राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे म्हटले गेले पाहिजे. यासोबतच मराठी भाषा, अभिजात भाषा दर्जाबाबतही प्रत्येक शाळेत विविध उपक्रम राबविण्यात यावेत. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच वृक्षारोपणाचे महत्त्व कळावे यासाठी शाळांमध्ये 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम सुरू करण्यात यावा. यासाठी प्रत्येक झाडाला क्यूआर कोड देऊन, झाडांचा वाढदिवस देखील साजरा करावा. अधिकाऱ्यांपासून विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्येकाला एका झाडाच्या संगोपनाची जाबाबदारी देण्यात यावी, जेणेकरून विद्यार्थी त्या झाडाची काळजी घेतील.

श्री. भुसे म्हणाले, पुढील वर्षांपासून इयत्ता चौथी आणि सातवीचे विद्यार्थी देखील शिष्यवृत्ती परीक्षेला बसू शकतील. शाळांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी सामाजिक संस्थांची मदत घ्यावी. शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी विविध शासकीय योजनांद्वारे पायाभूत सुविधांचा विकास करावा. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळा दत्तक घ्याव्यात. काही शाळांबाहेरील पानटपऱ्यांवर कारवाई करावी. यासोबतच आधार, अपार आयडी पडताळणी, निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम आदी विषयांचाही श्री. भुसे यांना आढावा घेतला.

चर्नी रोड येथे बालभवन प्रकल्पाचे नूतनीकरण अंतिम टप्प्यात आहे. वेळापत्रक तयार करून विद्यार्थ्यांना बालभवन येथे शैक्षणिक सहलीसाठी आणावे. त्यांच्यातील कलागुणांना यामुळे वाव मिळू शकतो. सोबतच कलेची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना या बालभवनचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वास श्री. भुसे यांनी व्यक्त केला.

# कतार फॉर्मुला अजब

ज्योतिर्मय 📖 साहित्य

इराण आणि इस्त्रायलमध्ये युद्धबंदी घडवून आणणारा कतारचा फॉर्मुला अजबच म्हटला पाहिजे. कारण या युद्धबंदीने प्रथम इजरायलने बारा तास युद्धबंदी मान्य करावी. नंतर पुढे १२ तास इराणने युद्धबंदी सुरू करावी, असे सूचित केले. या अजब फॉर्मुल्यामध्येच दोन्ही देशांनी युद्धबंदीचा पोपट केला आणि खुद्द इजरायलने इराणवर पहाटेच हल्ला केला आणि इराणनेसुद्धा इजरायलवर हल्ले चढविले.

युद्धबंदी होवूनही एकमेकांवर हल्ले करण्याच्या अजब तंत्रामुळे बिचाऱ्या निष्पाप सामान्य नागरिकांचे बळी गेले. नो मोर वॉर म्हणून डिंडिमा पिटविणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांची फटफजिती झाली. त्यामुळे अध्यक्ष महोदय नेत्यांनेहूवर कमालीचे संतापले आणि त्यांना दूरध्वनी करून त्यांनी यापुढे युद्ध कराल तर याद राखा, असे सुनविले. पण, तरीही नेत्यांनेहू हे काही काळ ऐकण्याच्या पवित्र्यात नव्हते. पण, ट्रम्प यांनी निर्वाणीचा इशारा दिला आणि नेत्यांनेहू यांना माघार घेणे भाग पडले. आता हळूहळू इस्त्रायलमधील शहरे सुरळीत होत आहेत आणि लोकजीवन पूर्वत होत आहे. दीर्घकालीन युद्धामुळे इस्त्रायलमधील लोक चिंताग्रस्त व भयग्रस्त झाले आहेत. त्यांना युद्ध नको, तर शांतता हवी आहे. पण, नेत्यांनेहू यांना इतिहासात महान असा पराक्रम नोंदवायचा आहे आणि पुढील निवडणूक जिंकायची आहे म्हणून ते काही केल्या युद्ध थांबवू इच्छित नाहीत. एकीकडे गाझावरची चढाई चालू आहे आणि दुसरीकडे इराणच्या आघाडीवर सुद्धा त्यांचा पवित्रा आक्रमक असा आहे.

चित्र कसे बदलले ?

ट्रम्प २२ वर्षानंतर मोठी आक्रमक योजना घेऊन इराणवर चढाई करण्यासाठी सज्ज झाले. तशी त्यांनी कारवाईही केली. परंतु, इराणने कतारमधील अमेरिकेच्या लष्करी तळावर केलेल्या हल्ल्यामुळे ट्रम्प यांना धक्का बसला व तसा धक्का बसणे साहजिक होते. जगामध्ये आशियासह अनेक खंडांमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत व तीच अमेरिकेची शक्तिस्थाने आहेत. या

पैकी एका केंद्रावर हल्ला चढविला, तर त्यामुळे एवढा महाउत्पात झाला. इतर केंद्रांवर हल्ले चढविल्यास अमेरिकेची पाचावर धारण बसली असती. त्यामुळे ट्रम्प यांना नरमाईचे धोरण स्वीकारणे आणि युद्धबंदीकडे वळणे भाग पडले. नाक दाबले की तोंड उघडते, या न्यायाने इराणने केलेली ही कारवाई डावपेच म्हणून महत्त्वाची ठरली, असे म्हटले पाहिजे.

ट्रम्प यांची चाल मोठी बेभरवशाची असते. जगाला असे वाटत होते की, आता युद्ध थांबणार नाही. ट्रम्प यांनी घूमजाव करून युद्ध थांबविले. त्यामागे दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे अमेरिकेला शक्तिपात होऊ द्यावयाचा नाही आणि दुसरे म्हणजे टेरिफ वॉर






आर्थिक आघाडीवर चालू असताना पुन्हा युद्ध आघाडीवर मोठा खर्च करणे म्हणजे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा कडेलोट करणे होऊ शकते. त्यामुळे त्यांनी बारा दिवसांचे युद्ध संपविण्याचा निर्णय घेतला. खरे तर अमेरिकेचे युद्धात उडी घेणे आणि युद्ध थांबविणे या दोन्ही गोष्टी मोठ्या कुटिल मुत्सद्येगिरीचा एक डाव म्हटला पाहिजे. अमेरिकेने इस्त्रायलचाही उपयोग करून घेतला आणि नेत्यानेहू जेव्हा ऐकत नाहीत, तेव्हा त्यांना वेळीच थांबविण्याचाही ट्रम्प यांनी प्रयत्न केला. त्यांनी वापरलेले शब्द अपशब्द हे नेत्यांनेहू यांना लागले असतील, पण त्यांना थांबवण्यासाठी अशी धाडसी भूमिका घेणे आवश्यक होते. इस्त्रायल नेत्याचे पंख छाटणे आवश्यक होते, अशी ट्रम्प यांची धारणा दिसते.

**प्रश्न कसे सुटतील?**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आरंभापासून म्हणत आहेत की, युद्धाने नव्हे, तर तडजोडीने आणि मुत्सद्देगिरीने प्रश्न सोडवावेत. युद्धाने विनाश होतो आणि त्यामुळे जीवित व वित्तहानी होते. सबंध मानव समाजावर त्याचे विपरीत परिणाम होतात. पण, असे असूनही बडी राष्ट्रे आपल्या शस्त्रांची बाजारपेठ तेजीत ठेवण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रांत संघर्ष घडवून आणतात आणि तापलेल्या तव्यावर आपली पोळी भाजतात. आता बारा दिवसांचे युद्ध तर थांबले आहे. पण, नेत्यांनेहू त्यांची निवडणूक होईपर्यंत या ना त्या मार्गाने इस्त्रायलमधील कारवाई, पॅलेस्टाईनमधील कारवाई कायम ठेवतील आणि इराणलासुद्धा धाकदपटशा दाखवून आपण त्याच्यापेक्षा काकणभर कसे श्रेष्ठ आहोत, हे दाखवण्याचा प्रयत्न करतील. कारण त्यांची लढाई त्यांच्या राजकीय अस्तित्वासाठी आहे. त्यांच्या स्वतःच्या भवितव्यासाठी आहे. केवळ इजरायलच्या सामर्थ्यासाठी आहे, असे नाही. इराण व इस्त्रायल यांनी शांत डोक्याने विचार करून समतोल दृष्टी ठेवली पाहिजे, तरच पुढील विनाश टाळता येवू शकेल.

**भू-राजनैतिक मूल्यमापन**

राजेनैतिक दृष्टीने मूल्यमापन केले असता असे दिसते की, बारा दिवसांचे युद्ध कोणाच्या पथ्यावर पडले तर अर्थातच एकदा अमेरिकेच्या पथ्यावर पडले आहे. कारण अमेरिकेने सर्व आखाती देशांना चकित करून टाकले आणि आपला वरचष्मा सिद्ध केला. इराणवर अचानक केलेली कारवाई ही त्याच्या अणुप्रकल्पाला सेटबॅक लगाम (सेटबॅक) खेळणारी ठरली. सहा महिन्यांनी तरी त्यांचा अणुप्रकल्प लांबला आहे. एवढे मर्यादित यश घेऊन ही मोहीम थांबली आहे. भविष्यकाळात अमेरिकेचा डोळा इराणमधील समृद्ध युरेनियम साठ्यांवर आहे, तसेच तो तेथील तेलसाठ्यांवर सुद्धा आहे. ताबडतोब जगाला होणारा तेल पुरवठा बंद करण्यात आल्यामुळे जगभरातील तेलाच्या किमती भडकल्या आणि जगातील टंचाईला सुरुवात झाली. आता ही बंदी इराण केव्हा उठवणार, हा प्रश्न आहे. या इराणच्या थेट कारवाईचे परिणाम जगाच्या अर्थकारणावर जसे होतील, तसे अमेरिकेच्या अर्थकारणावरसुद्धा होतील.




## जात्यावरच्या ओव्या......

हाऊस मला मोठी
जोडीच्या पाव्हण्याची ,
करते बोळवण
लेखी संग जावयाची ||१६३||

राती पडलं सपन
दिवसा पडेना चईन
भाऊला बाई मह्या
कधी डोळ्याने पाहिनं||१६४||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## गार्निशिंग जीवनाचं...



### उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

स्वयंपाकघरात एक गोडशी धावपळ सुरू होती. सौ. कुठलातरी छान पदार्थ बनवत होती. त्या पदार्थाचा मंद सुवास संपूर्ण घरभर पसरला होता. तिचा स्वयंपाक पूर्ण झाला आणि समोर आली ती एक सुंदर सजवलेली डिश. त्या पदार्थाचा मी कधी आस्वाद घेतो असे मला झाले.

खरंतर प्रत्येक घरामध्ये अशी एखादी गृहिणी आपल्या प्रेमाच्या माणसांसाठी खास पदार्थ नेहमीच तयार करत असते. त्याच वेळेस ती गृहिणी एका शांत, ठाम दृष्टीने शेवटी दिसणाऱ्या थाळीकडे पाहत असते. कारण आपल्या माणसांसमोर तो पदार्थ सादर करताना तो शेवटी कसा दिसावा याचे चित्र तिच्या मनात असते. चव, पोत, रंग आणि सुगंध यांच्या चौकटीत एक सुंदर दृश्य ती मनातल्या मनात रंगवत असते. एखादा खास पदार्थ तयार करताना ती केवळ कृती करत नाही ती एक स्वप्न घडवत असते. शेवटचा तो कोथिंबिरीचा साज, डाळीवरचा तुपाचा चमचमता थेंब, ताटात केलेली सुबक मांडणी ही तिच्या दृष्टिकोनाची साक्ष असते.




तिच्या डोळ्यांसमोर शेवट असतो एक परिपूर्ण थाळी ! अशी ही सुंदर थाळी सजवून समोर ठेवणं म्हणजे गार्निशिंग. ( गार्निशिंग म्हणजे एखाद्या पदार्थाला (मुख्यतः अन्नाला) अधिक आकर्षक आणि चवदार बनवण्यासाठी त्यावर केलेली सजावट. )

आणि ते पाहताना वाटतं, की ही कृती ''शेवट डोळ्यासमोर ठेवणं'' केवळ स्वयंपाकापुरती मर्यादित नाही. ती संपूर्ण जीवनाचं सार सांगते.

ताटात वाढलेली पोळी, भाजी, वरण-भात याच्या जोडीला जर कोथिंबिरीची चटणी, एखादी पापडाची चंचल आकृती, किंवा गुलाबाच्या पाकळ्यांमध्ये लपवलेली कोशिंबीर दिसली, तर काय होतं ? त्या जेवणाला एक साज चढतो. आपुलकीची झाक येते. ती थाळी डोळ्यांत भरते आणि मनही भरते. आणि म्हणूनच मी म्हणतो, गार्निशिंग केवळ अन्नाचं नसतं, ते आयुष्याचंही असतं ! सजवलेपणाचं मोल हे अंतःकरणातून येतं. सजावट म्हणजे केवळ बाह्य प्रदर्शन नव्हे. ते आपल्या अंतःकरणातली भावना, आपुलकी, आणि समर्पणाचं दर्शन असतं. सौंदर्य केवळ दाखवण्यासाठी नसावं, तर देण्यासाठी असावं.

स्वयंपाकगृहातील एखादी गृहिणी केवळ पोट भरण्यापुरतं नव्हे, तर मन तृप्त करण्याचंही कार्य करते. जेवणाचं गार्निशिंग हे तिचं प्रेम, काळजी, आणि सौंदर्यदृष्टी याचं प्रतिक असतं. आणि आयुष्यातसुद्धा, आपल्या कृतींना, नात्यांना, विचारांना जर सजावटीचा, कलात्मकतेचा, आत्मिकतेचा स्पर्श असेल, तर ती जीवन-थाळी मनोहारी होते.

थाळीतील सजावट सुसंगत दिसण्यासाठी काही जागा मोकळी ठेवावी लागते. प्रत्येक गोष्ट थाळीत टाकली, तर ते जेवण खचाखच भरलेलं वाटतं. पण जर योग्य गोष्टींची निवड केली, अनावश्यक गोष्टी टाळल्या, तर सौंदर्य खुलतं. आयुष्यातही तसंच. आपल्या आयुष्यातही शांततेचे क्षण, विरामचिन्हं, यांना जागा द्यावी लागते. जीवनात सगळं मिळवण्याच्या नादात आपण काही महत्त्वाचं हरवून बसतो. लेस इज मोर हे तत्त्व इथेही लागू होतं. **(क्रमशः)**



### दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## मुक्तिचतुष्ट्य

ज्योतिर्मय साहित्य

दशक चौथा

समास दहावा


समर्थानी एकुण एकतीस ओव्यात हा समास गुंफला आहे.

ब्रम्ह अव्यक्त व आकाररहित आहे. तेव्हा तिथे व्यक्त व साकार अनुभूती नसते. या निर्गुण निराकार ब्रम्हामध्ये एक स्फुरण आले त्याला अहंकार असे नाव दिले. अहंकाराचे स्फुरण शक्तिरूप असते. त्यातुन तेज प्रगटते. व त्या तेजाच्या आधाराने जिकडे तिकडे पाणीच पाणी भरून राहिले. असं म्हणतात की त्या पाण्याच्या आधाराने शेषाने आपल्या मस्तकावर संपूर्ण धरती उचलून धरली. छप्पन्न कोटी योजने एवढा तिचा विस्तार आहे. तिच्या भोवती सात सागरांचा वेढा आहे

धरतीच्या मधोमध मेरू पर्वत आहे. आठ दिशापालकांच समुह या सर्वाचं रक्षण करतो. चौ-यांशीं हजार योजने त्याची रूंदी आहे. त्याची ऊंची मोजणे अशक्यप्राय गोष्ठ आहे. तो संपूर्ण सोन्याचा आहे.

तर सज्जन वाचक मित्रांनो आजच्या काळातला सर्व जगाचा नकाशा डोळ्यापुढे आणा व समर्थानी त्या काळात कुठल्याही प्रकारची साधने नसताना किती तंतोतंत अभ्यास करून अवनी चे वर्णन केले आहे हे अभ्यासले तर तोंडात बोट गेल्या शिवाय रहात नाही.

बद्रिकाश्रम, बद्रिकेदार, या मोक्षाच्या ठिकाणांचा पण समर्थानी अभ्यास केला आहे. मेरूपर्वताच्या शिखरावर पठार भागात तीन शिखरे आहेत. तिथे ब्रम्हा विष्णू, महेश आपल्या परिवारासह तिथे रहातात. ज्यावर ब्रम्हा रहातो ते शिखर साधे दगडाचे आहे. विष्णु रहातो ते शिखर पांचूचे आहे. आणि शंकर रहातात ते शिखर स्फटिकाचे आहे त्यालाच कैलास म्हणतात व पाणी असलेल्या भागाला कैलास सरोवर म्हणतात. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## कर्तेपणा टाकणे हाच परमार्थ !

ज्योतिर्मय साहित्य

दोरीला जो साप म्हणून समजला तो बद्ध; पण दोरीला दोरी म्हणून ज्याने ओळखले, तो मुक्त समजावा. ' देही मी नव्हे ' हे ज्याला समजले तो मुक्तच. सत्यज्ञान करून घेणे म्हणजेच मुक्तावस्था आहे. बद्धदशा आमची आम्ही निर्माण केली. काळजी, तळमळ आणि दु:ख ही बद्धपणाची लक्षणे होत, तर कोणत्याही परिस्थितीत आनंदात राहणे हे मुक्तपणाचे लक्षण आहे. जागे होणे म्हणजे मुक्तदशेला येणे आहे. माझे माझ्याजवळच आहे, पण ते ठाऊक नाहीसे झाले आहे. भगवंताला विसरल्याने ' मी देही ' असे म्हणू लागलो. देह तर माझ्या ताब्यात नाही, तेव्हा मी देही नाही हे सिद्ध झाले. आपण कर्तेपण आपल्याकडे घेतो, आणि त्याबरोबर सुखदु:खही आपल्याकडे येते. मला सुख नाही आणि दु:खही नाही असे ज्याला वाटेल, तो मुक्त समजावा.

कर्तेपण घातुक असते. मी एवढा मोठा वाडा बांधला, प्रपंच चांगला केला, असा प्रापंचिकाला अभिमान वाटतो, तर संन्यासी मठाचाच अभिमान धरून बसतो ! म्हणजे या कर्तेपणाच्या बाधेतून दोघांचीही सहजी सुटका होत नाही. हे कर्तेपण सोडावेसे वाटले तरी ते आपल्याला सुटत नाही, याचा आपल्याला नेहमी अनुभव येतो. भगवंताचे अस्तित्व पटल्यानेच कर्तेपणा कमी होतो. म्हणून, भगवंताच्या अखंड स्मरणात राहावे, आणि भगवंत ठेवील त्यात समाधान मानावे. भगवंताच्या स्मरणाशिवाय जिथे आपल्याला सुख होते, तो विषय समजावा. विषयाच्या संगतीत परमात्म्यापासून वेगळे असणे याचे नाव प्रपंच, आणि परमात्म्याच्या संगतीत विषयात राहणे याचेच नाव परमार्थ.

फळाची अपेक्षा ठेवून आपण जी कृती करतो ते कर्म होय; पण फळाची अपेक्षा न ठेवता आपण जे कर्म करतो ते कर्तव्य ठरते. आणि असे कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करीत राहणे हाच परमार्थ. हे करीत असताना भगवंताला दृष्टिआड न होऊ देणे, याचेच नाव अनुसंधान होय. समजा, आपण एखादे चांगले पुस्तक वाचीत बसलो आहोत, इतक्यात आपल्या पायाला एक मुंगी चावली; त्याची जाणीव आपल्याला कशी चटकन होते ! ती जाणीव सर्व शरीरभर व्यापून असते, त्याचप्रमाणे भगवंताच्या अनुसंधानाने प्रपंचाला व्यापून ठेवले पाहिजे. प्रपंचातला कोणताही उद्योग करताना अनुसंधान टिकवावे. अनुसंधानाचा अभ्यास करावा. भगवंताचे अनुसंधान आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. मी अनुसंधान टिकवीन असा मनाचा निश्चय करावा.

आपले कर्तव्याला न विसरावे ।
भगवंताचे अनुसंधान राखावे ।।

## ।। संत महात्म्य ।।

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती ।
रत्नकीळा फांकती प्रभा
अगणित लावण्य तेजःपुंजाळले ।
न वर्णवे तेथीची शोभा ।।१।।
कानडा हो विठ्ठलु कर्नाटकू
शब्देंवीण संवादु दुजेविण अनुवादु ।
हें तंव कैसेंनि गमे ।
परेहि परतें बोलणें खुंटलें
वैखरी कैसेंनि सांगे ।।३।।
पाया पडुं गेलें तंव पाउलचि न दिसे ।
उभाचि स्वयंभु असे
समोर कीं पाठीमोरा न कळे ।
ठकचि पडिलें कैसें ४।।
क्षेमालागीं जीव उतावीळ माझा ।
म्हणवूनि स्फुरताती बाहो
क्षेम देऊं गेले तंव मीची मी एकली आसावला जीव राहो ।।५।।
बाप रखुमादेविवरू ह्रदयींचा जाणुनि ।
अनुभवु सौरसु केलादृष्टीचा डोळा पाहों मी गेलीये
तंव भीतरीं पालटुझाला ।।६।।

ज्ञानेश्वर माऊलींचे हे गीत, ह्या ओळी आपला आठवतात त्या आशाताईंच्या मधुर गळ्यातून गायलेल्या या गीतांच्या वेळी. आशाताईंचा स्वर इतका मृदू मुलायम आणि भक्तीरसपूर्ण आहे की त्यात माऊलींचे शब्द आपण विसरून जातो. खरे तर हा ज्ञानेश्वर माऊली यांनी प्रभू दर्शनाचा अनुभव या गीतातून शब्दबद्ध केला आहे.

पंढरपूरचा पांडुरंग आपणही पाहिला आहे. त्याचे अनेक वेळा आपणही दर्शन घेतले आहे. मग तो काळ्या पाषाणातील पांडुरंग आपणास दिव्य कांती सह तेजपुंज होऊन का बरे दिसत नाही ?आणि ज्ञानेश्वर माऊलींनाच तो तसा का दिसला? याचा आपण आता विचार करूयात.

हे चैतन्याचे मनोहर दर्शन आणि प्रत्यक्ष अनुभव यावयाचा असेल तर दोन पद्धती अस्तित्वात आहेत.१) *अभावयोगी* व २) *योगी* या दिव्य साधनांद्वारे जडातूनही चैतन्याचे उद्धवन व त्याचा या देहातून अनुभव हे होऊ शकते.

अभावयोगी कोणास म्हणावे? व योगी कोणास म्हणावे? हे आपण आता पाहू.

अभाव योगी

या प्रकारात यम, नियम, आसन प्राणायाम प्रत्याहार धारणा ध्यान व समाधी या अष्टांग योगाच्या पायऱ्याने कष्टपूर्वक व योग्य शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करावयाचा असतो हटयोग, रामदेव बाबा हे सांगत असलेली आसने मुद्रा, बंध, प्राणायाम, सुदर्शन क्रिया विपश्यना इत्यादी सर्व या प्रकारात येतात. इथे विशिष्ट आसने मुद्रा योग्य पद्धतीने करावयाची असतात.

ध्यान लावणे, त्राटक करणे हे कष्ट साध्य आहे. पण ते वैज्ञानिक पद्धतीने केले पाहिजे.

यम, नियम, आसन, प्राणायाम प्रत्याहार याद्वारे मनाची एकाग्रता करता येते. मन बाह्य विषयाकडून वळवून आत्म्याकडे वळवता येते, व आत्म दर्शनापर्यंत जरी याची पोहोच होत नसेल तरी बऱ्याच प्रमाणात यश मिळू शकते. असे प्रयत्नपूर्वक वैज्ञानिक प्रयोग करणाऱ्यांना अभावयोगी म्हणतात. हे मी माझ्या मागील अभंगात एकदा स्पष्ट केलेले आहे.

इथे आसनाच्या स्थिती प्राणायाम मधील गती या स्वतःहून निश्चित करावयाच्या असतात. आणि यात चूक झाली तर रोग उफाळून येऊ शकतो. असे प्रयत्नपूर्वक साधना करणाऱ्यांना अभावयोगी म्हणतात.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री
सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं मे दृष्टिविषयो भव।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं मे वाणीविषयो भव।। ४८ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या दृष्टीचा विषय हो. जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझ्या वाणीचा विषय हो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीगुरुणाभिपूजिते।**
**सुराराध्ये कुलाराध्ये समर्चिते नमो नमः।। ४९ ।।**

हे श्रीगुरुंनी अभिपूजित जगदंबिके, तुला नमस्कार असो. देवांची आराध्य, कुलाची आराध्य,समर्चिते अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रव्या कथा मया तव।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कथ्या कथा मया तव।। ५० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी ऐकावी. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. तुझी कथा मी सांगावी.

**जगदम्ब नमस्तुभ्यं कुलरक्षणहेतवे।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं नित्यमुत्कर्षहेतवे।। ५१ ।।**

कुलाच्या रक्षणासाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्यउत्कर्षासाठी श्रीरेणुके, तुला नमस्कार असो.



## आरोग्य संजीवनी

## निरोगी दृष्टिकोन राखणे

ज्योतिर्मय साहित्य

आजकालच्या महिलांचे जीवन व्यस्त आणि आव्हानात्मक आहे. काम, कुटुंब आणि इतर बाबींमुळे तुम्हाला वेगवेगळ्या दिशेने ओढले जाऊ शकते आणि ताण येऊ शकतो, ज्यामुळे स्वतःसाठी फारसा वेळ उरत नाही. स्वतःसाठी थोडा वेळ घेऊन तुमचे जीवन संतुलित करायला शिकल्याने मोठे फायदे होतील –

निरोगी दृष्टिकोन आणि चांगले आरोग्य.

तुम्ही घेऊ शकता अशी पावले:

कुटुंब आणि मित्रांच्या संपर्कात रहा.

तुमच्या समुदायात सहभागी व्हा.

सकारात्मक दृष्टिकोन ठेवा आणि तुम्हाला आनंद देणाऱ्या गोष्टी करा.

तुमची उत्सुकता जिवंत ठेवा. आयुष्यभर शिकणे तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

निरोगी जवळीक सर्व रूपात असते परंतु ती नेहमीच जबरदस्तीपासून मुक्त असते.

तुमच्या आयुष्यातील ताण ओळखायला आणि त्याचे व्यवस्थापन करायला शिका. झोप न लागणे, वारंवार डोकेदुखी आणि पोटाच्या समस्या; खूप रागावणे; आणि ताण कमी करण्यासाठी अन्न, औषधे आणि अल्कोहोलचा वापर करणे ही ताणतणावाची लक्षणे आहेत.




संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

ताणतणावाचा सामना करण्याचे चांगले मार्ग म्हणजे नियमित व्यायाम, निरोगी खाण्याच्या सवयी आणि खोल श्वास घेणे किंवा ध्यान करणे यासारखे विश्रांतीचे व्यायाम. विश्वासू कुटुंबातील सदस्यांशी आणि मित्रांशी बोलणे खूप मदत करू शकते. काही महिलांना असे आढळते की तणावाच्या वेळी त्यांच्या धार्मिक समुदायाशी संवाद साधणे उपयुक्त ठरते.

पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या. प्रौढांना रात्री सुमारे आठ तासांची झोप आवश्यक असते.

***

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

सर्व आईं यांनी रामाला पाहून दुःख व्यक्त केले.शेवटी भरताने येण्याचे प्रयोजन हे तुम्हास परत नेण्याचे आहे हे सांगितले. ज्याबली हा दशरथाच्या पदरी मंत्री होता पण तो पूर्ण नास्तिक होता.त्याने नास्तिकाचे असे तत्वद्न्यान मांडले. रुनम कृत्वा घृतं पिवेत हे चार्वाकाचे तत्वद्न्यान होते.ज्याबली ने तर्काला पटतील असे युक्तिवाद केले.तो म्हणाला या वाचतात काय पडले आहे?राज्य मिळते आहे तर घ्या भोगून. प्रभुंनी नास्तिक वादाचे खंडण केले आस्तिक मतांची स्थापना झाली.वशिष्ठानी रामास तू ज्येष्ठ आहेस तू नियमाने राजा झाले पाहिजे. रामांनी बलाबल पाहिले.वडिलांची आज्ञा पुन्हा मानण्यास मिळणार नाही.पुन्हा राज्य स्विकारता येईल. म्हणून पित्याच्या आदेशाचे आधी पालन करू. भरताने सत्याग्रहच केला. तुम्ही आले पाहिजे हे वारंवार सांगितले. भरताने शेवटी मला तुमच्या पादुका द्या, त्या गादीवर ठेऊन तुमच्या साठी मी राज्य कारभार पाहिन.मी केवळ तुमचा प्रतिनिधी असेन . तुम्ही मात्र चवदार वर्षे झाली की परत यायलाच हवे असे निक्षून सांगितले व तो जड अंतःकरणाने परतला. पुन्हा अयोध्या दुःखी कष्टी झाली. भरताने असे ठरविले की, इथे आता महालात रहायचे नाही. नगरा बाहेर झोपडीत राहू.गवतावर झोपू,वल्कले नेसू.व तसाच तो राहू लागला. राम अत्रि ऋषींचा आश्रमात आले. तिथे अनसूयेने सीतेला पातिव्रत धर्माचा उपदेश केला.अनुसयेने सीतेला पुन्हा अलंकार दिले. वस्त्रे दिले.अत्रि ऋषींनी रामास अंगठी दिली.

उर्वरीत भाग उद्या होईल..... **(क्रमशः)**

## फुलमाला....



झेंडू...

पिवळ्या केशरी रंगामध्ये
सर्वत्र फूलते झेंडूचे फुल
आकर्षक प्रसन्न रुपासह
सुगंधाचीही पडते याची भूल

दसरा,दिवाळीला याचा मान
तोरण शुभंकर सजते दारी
रांगोळी अन् सजावटही
या फुलांमुळे खुलते भारी

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज

# गुरुपौर्णिमेच्या निमित्त विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – गुरुपोर्णिमेच्या निमित्याने भगवती मंदिर बाणेर येथे भगवती सेवाश्रम व जीवन कैवल्य विकास या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मनाचे श्लोक स्पर्धेत विजेत्या बालकांनां मोफत २५ सायकलीचे वाटप करण्यात आले.यावेळी संगणक प्रशिक्षक यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प.पू. श्री.बाबू महाराज मानवतकर यांचे शिष्यगण उपस्थित होते. कार्यक्रमात बाणेर येथिल दानशूर व्यक्तीमत्व अशोकजी नवाल, डॉ. शाम दलाल, चिटणीसकाका, राहूल दादा बालवडकर इ.व्यक्तीमत्व उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यास

गिरीधरभाई राठी, प्रकाश बोकील, डॉ. श्याम कुलकर्णी,डॉ.पुष्कर दलाल रामधनीसर यांनी पुढाकार घेतला, या कार्यक्रमास



बालकांचे माता-पीता व भक्तगण उपस्थित होते.

## प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना समाजक्रांती राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**



**पिंपळनेर** – येथील भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर (प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता, लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय समाजक्रांती पुरस्कार जाहीर झालेला आहे. बी.एस.एफ बहुउद्देशीय सामाजिक संस्था अमरावती या संस्थेच्या शितल गजभिये यांनी ही माहिती दिली. संस्थेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. पुरस्कार वितरण सोहळा १७ ऑगस्ट २०२५ रोजी अमरावती शहरात होणार असून मराठी हिंदी चित्रपटातील नायक, नायिका, गायक, संगीतकार व सिलेब्रीटी या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहेत.


## सात दिवसीय ऑनलाईन भागवत कथेची सांगता


**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे - दि. ४ जुलै ते १० जुलै २०२५ या कालावधीत 'अभिज्ञान, पुणे' या संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय ऑनलाईन श्रीमद्भागवत कथेची भक्तिपूर्ण सांगता झाली. दररोज संध्याकाळी ७ ते ८ या वेळेत झुम आणि युट्युब च्या माध्यमातून ही कथा श्रोतृवर्गापर्यंत पोहोचवण्यात आली.

या कथेस देश-विदेशातून श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कथावाचन अभ्यासपूर्ण, भावपूर्ण आणि अनुशासित पद्धतीने सादर करण्यात आले. श्रीकृष्णचरित्र, भक्तांचे आदर्श, धर्म आणि अध्यात्म यांचा सुंदर समन्वय या कथेतून उलगडण्यात आला. ह.भ.प. डॉ. चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर यांच्या अमृतवाणीतून हा श्रीमद्भागवत कथा उत्सव संपन्न झाला. श्रोत्यांनी दिलेल्या सहकार्यामुळे कार्यक्रम अत्यंत शांततापूर्ण वातावरणात पार पडला. झुम वर सहभागी होऊ न शकणाऱ्या श्रोत्यांसाठी युट्युब चॅनेलवरून थेट प्रसारणाची व्यवस्था करण्यात आली होती. 'अभिज्ञान, पुणे' संस्थेच्या वतीने सर्व श्रोते, तांत्रिक सहकारी व मार्गदर्शक यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. श्रीमद्भागवत कथेचा हा सातदिवसीय सोहळा श्रोत्यांसाठी एक अध्यात्मिक पर्वणी ठरला.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

### मानवतावादी धर्माचा साक्षात्कार

रवींद्रनाथ हे भारतीय संस्कृती आणि परंपरांचे अभिमानी असले आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणून परदेशात त्यांनी प्रतिनिधित्व केले असले तरी देखील नेहमीच पारंपारिक गोष्टी जशाच्या तशा स्वीकारण्यापेक्षा त्यावर विचार करून, त्यात काहीतरी बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न नेहमीच राहिला. त्यांची धर्मविषयक कल्पना सुद्धा अशाच प्रकारे विकसित पावली. भगवद्गीतेमध्ये परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचे तीन मार्ग सांगितले आहेत. ज्ञानमार्ग, भक्तीमार्ग आणि कर्ममार्ग. परंतु रवींद्रनाथांचे म्हणणे असे की अशा वेगवेगळ्या प्रकारे परमेश्वर प्राप्तीचा प्रयत्न करण्यापेक्षा ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचा मेळ घालून परमेश्वरापर्यंत आपल्याला पोहोचता येईल.

ईशोपनिषदात असे म्हटले आहे की
ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ।।

(याचा अर्थ हे सर्व चराचर जग ईश्वराने व्याप्त आहे. त्याचा जाणीवपूर्वक उपभोग घ्यावा. मी त्याचा मालक आहे, हे सर्व माझे आहे या भावनेने त्यांचा उपभोग घेऊ नये.)

या दृश्य जगातील प्रत्येक गोष्ट परमेश्वराने व्यापलेली असली तरी सुद्धा रवींद्रनाथांच्या मते मानव हा परमेश्वराचे सर्वात जवळचे रूप आहे. मानवात परमेश्वर विद्यमान आहे. मानवाच्या माध्यमातून त्या अदृश्य आणि सर्व शक्तीमान परमेश्वरापर्यंत पोहोचता येणे शक्य आहे. ईश्वराची कृपादृष्टी मानवावर मानवाद्वाराच होऊ शकेल असे ते म्हणतात. आपले म्हणणे स्पष्ट करण्यासाठी ते स्त्री चे उदाहरण देतात. एकच स्त्री वेगवेगळी नाती आणि भूमिका निभावते. ती कोणाची मुलगी असते, कोणाची बहीण असते, कोणाची तरी मैत्रीण असते, कोणाची तरी पत्नी असते. परंतु तिच्या मुलासाठी तिचे केवळ एकच असे दृढ नाते असते. ते म्हणजे आई आणि मुलाचे. केवळ आईच्या नात्यामुळेच तिचा मुलाशी निकटचा आणि सबळ संबंध असतो. त्यावेळी जगातली इतर नाती तिच्या दृष्टीने अनोळखी आणि निरुपयोगी अशी असतात. त्याचप्रमाणे परमेश्वर जरी वेगवेगळ्या रुपात व्यक्त होत असला तरी तो मानवासाठी मानव म्हणून अधिक जवळचा आहे. परमेश्वर मानवासमोर मानवतेच्या सच्चा आणि दृढ स्नेहाच्या स्वरूपात प्रकट झाला आहे. त्याच्या या नात्यामुळेच आपण त्याला ओळखू शकतो, त्याच्यावर प्रेम करतो आणि त्याची सेवाही करतो.

ईश्वराचा शोध घेण्याच्या घेण्याच्या त्यांच्या या प्रयत्नामुळे त्यांना मानवातील ईश्वराचा साक्षात्कार झाला. त्याची निष्काम सेवा करण्याचा विचार त्यांच्या मनात दृढ झाला. आपण केवळ ज्ञान, प्रेम आणि सेवा यांच्या माध्यमातूनच त्या अदृश्य शक्तीपर्यंत (ईश्वरापर्यंत) पोहोचू शकतो हा त्यांचा चिंतनातून निर्माण झालेला विचार होता. रवींद्रनाथांच्या धर्मविषयक संकल्पनेचा मानव हाच केंद्रबिंदू होता. ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये १९३० मध्ये जी हिबर्ट व्याख्यानमाला झाली, त्या व्याख्यानमालेमध्ये देखील त्यांनी आपले हेच विचार प्रकट केले. मानवता धर्माचा उद्घोष त्यांच्या व्याख्यानात होता. त्यांचे हे विचार रिलीजन ऑफ मॅन या ग्रंथात प्रकाशित करण्यात आले आहेत.

या आध्यात्मिक साक्षात्कारानंतर त्यांनी स्वतःच्या हृदयातील ईश्वराचा शोध घेण्याचे थांबवून सामान्य माणसांमध्ये ईश्वराला पाहणे पसंत केले. त्यांच्या दृष्टीने असंख्य अशी सामान्य माणसे क्षुद्र नव्हती तर ईश्वराचा साक्षात अवतार होती. जनता हीच जनार्दन. हिच गोष्ट त्यांच्या कवितेची प्रेरणा ही ठरली. त्यांच्या एका कवितेतील काही ओळी अशा आहेत... **(क्रमशः)**

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

**ज्योतिर्मय साहित्य**



**श्याम ठाणेदार**
**पुणे**

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो. आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.



## इंदापूरी निखारे

### पालक कोण?




**ज्योतिर्मय साहित्य**

सकाळी सकाळी नेहमीप्रमाणे दारावरील बेल ओरडली आणि दार कोणी उघडायला जायचे या क्षुल्लक गोष्टीवरून त्या दोघांची वादमय दिवसाची सुरुवात झाली. दोघेही निवृत्त अधिकारी असल्यामुळे वादविवाद करण्यात एकदम निपुण !बहुतेक सर्वांची दिवसाची सुरुवात कोवळ्या किरणांच्या साक्षीने होत असते पण हे निवृत्त उच्च अधिकारी! त्यामुळे त्यांच्याकडे ती बिचारी कोवळी किरणे थरथर कापत येत असावी!

त्यांच्या वादावादीमध्ये एक उच्च दर्जा असायचा त्याचे सामान्य लोकांना त्याचे खूप कौतुक वाटत असे... शेवटी ती उठली, दार उघडले आणि वाकून दुधाची पिशवी घेतली तर समोर पोलीस अधिकारी! तीने आश्चर्याने विचारले, तुम्ही दुध घेऊन आला? या ना आतमध्ये, चहा घेऊन जा! तो म्हणाला त्यासाठी नाही आलो, तुमची मुलगी कोठे आहे? तुम्ही तिचा खून केला असावा अशी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार केली आहे...

कोणी? काहीतरीच? मुद्दाम कोणीतरी केली असणार! काय नाव आहे त्याचे ज्यानी तक्रार केली आहे ? ते नाही सांगता येणार सर आणि ते तुम्हाला कशाला सांगू?

मुलगी कोठे आहे ते सांगा?

केव्हा खून झाला असे म्हणाला?

दोनतीन दिवसापूर्वी...

मुलगी बेंगलूरू येथे आहे, काल रात्री व्हीडिओ कॉलवर बोलणे झाले! म्हणजे रोज रात्री तर नक्कीच होत असते...

कशावरून? हा तिचा काल आलेला कॉल, अर्धा तास बोलणे होते कमीतकमी आम्हा दोघांचे...

आता किती वाजले? सव्वा सात ना! एक मिनिट थांबा, तिला व्हीडिओ कॉल लावतो...

हॅल्लो झिंकू बेटा...

बोला बाबा...

अगं, आत्ता पोलीस अधिकारी आले आहेत, पोलीस स्टेशनला कोणीतरी तुझा खून झाला अशी तक्रार केली आहे! दोन मिनिटे बोल त्यांच्याशी...

हॅल्लो सर, मी शनिवारी येणार आहे तेव्हा आले तर चालेल ना? कोणीतरी खोटी तक्रार केली आहे !बाकी कंपनी मध्ये पण चौकशी करा सर. बाबा पत्ता, फोन नंबर, ई-मेल आय डी वगैरे देतील. चालेल ना?

आता झाली ना खात्री सर? बायको चहा घेऊन आली. पण मग खोटी तक्रार का केली असावी? दोघेही काहीच बोलत नाही...

पण चौकशी करावीच लागणार, शनिवारी मुलगी आली की पोलीस स्टेशनला मुलीला घेऊन यावे लागेल हे पोलिसी खाक्यात सांगितले...

शनिवारी पोलीस स्टेशन मध्ये, मुलीला घेऊन, खोटी तक्रार वगैरे वगैरे! आणि तक्रार करणारा समोर! यांनी तक्रार दिली आहे का? उत्तर दिले आहे त्यांनी, आता तुम्ही बोला, तिघांपैकी कोणीही...

मुलगी म्हणाली मीच बोलते. चालेल ना?

हे माझे आईवडील! कायद्याने! मला यांनी दत्तक घेतले मी ३ वर्षाची असतांना आणि हे माझे जन्मदाते आईवडील...

या दोघा आईवडिलांनी...

माझ्यासाठी खूप काही भोगले...

पण कायम मनात एकच विचार...

मला चांगले शिकवून मोठे करायचे... ते केलेही...

आता मी मोठी झाली आहे...

यांच्यामुळे स्वतःच्या पायावर खंबीर पणे उभी आहे... मला माझे स्वतःचे निर्णय घेता येतात...

पण या दोघांच्या वादामुळे...

वाद असं पण म्हणता येणार नाही...

किंवा मला माझा निर्णय नीट घेता येत नसावा...

असेही असेल...

या दोघांचे म्हणणे की...

तू कायद्याने आमची मुलगी आहे...

त्यांचा तुझा काही संबंध नाही...

आणि जन्मदाते आईवडिलांचे म्हणणे की...

आमचे रक्ताचे नाते आहे...

भावनिक विचार केला तर तेही पटते... कायद्याला भावना नसतात... असे म्हणतात... म्हणून हे मला जन्मदात्याला भेटू देत नाही...

अजूनही... कायदा म्हणून... म्हणून यांनी हा असा प्रयत्न केला असावा ... भावना म्हणून...

इथे कोठेतरी जवळच्या हॉटेल मध्ये आई पण आली असणार... तिला डोळेभरून मला पहायचे असणार... कायदा आणि भावना.. एकत्र असूच शकत नाही.. पण कायद्याचा अधिकार...

आणि मानवी भावनांचा आदर ठेऊन...

आनंदाने जगण्याचा प्रयत्न करता येईल ना!

हा प्रयत्न मला करावा लागणार...

आणि हा निर्णय मलाच घ्यावा लागणार...


## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# मालिक गुन्हेगारीकडे झुकणारा जबराट प्रवास

**ज्योतिर्मय साहित्य**

मालिक' ही ८० च्या दशकातील प्रयागराज (इलाहाबाद) मधील एका सामान्य माणसाची कहाणी आहे, जो केवळ ताकद मिळवण्यासाठी गुन्हेगारीच्या दुनियेत पाऊल टाकतो. हळूहळू तो रक्तपात, फसवणूक आणि सत्तेच्या हव्यासात अडकत जातो. या प्रवासात त्याचं रूपांतर एका प्रभावशाली 'गँगस्टर'मध्ये होतं. राजकुमार राव ने साकारलेला 'मालिक' हा पात्र अत्यंत ताकदीने उभा राहतो. मानुषी छिल्लरसोबत त्याची जोडी फ्रेश आणि आकर्षक वाटते.


ॲक्शन, रोमांस, थरार आणि भावना यांचं उत्कृष्ट मिश्रण या चित्रपटात आहे. कथा अनेक ट्विस्ट्स आणि टर्न्सने भरलेली, जी प्रेक्षकांना शेवटपर्यंत बांधून ठेवते. राजकारण, भ्रष्टाचार आणि मानवी लालसेचं सखोल दर्शन या चित्रपटातून  दिसून येते.

राजकुमार रावचा अभिनय विशेष कौतुकास्पद आहे. त्याने पात्रात जीव ओतला आहे. इतर कलाकारांचंही काम भक्कम आहे  विशेषतः प्रोसेनजीत, हुमा कुरेशी आणि स्वानंद किरकिरे यांचा अभिनय देखील वाखाणण्याजोगा आहे.

'मालिक' हा केवळ एक गुन्हेगारीपट नाही, तर ती एका माणसाच्या आतल्या संघर्षाची, महत्त्वाकांक्षेची आणि पतनाची कहाणी आहे. राजकुमार राव हा एक सकस व दर्जेदार अभिनेता असून त्याने पुन्हा या चित्रपटातून स्वतःला सिद्ध केले आहे.

एका सामान्य माणसातून गँगस्टर होण्यापर्यंतचा जबरदस्त प्रवास या चित्रपटात मांडण्यात आला आहे.राजकुमार राव हा असा अभिनेता आहे की जो कुठल्याही भूमिकेला प्राणवायू देतो. अक्षय कुमारदेखील त्याला अभिनय स्कूल सुरू करायला सांगतात, आणि 'मालिक' पाहिल्यावर आपल्याला जाणवतं आपण त्याला जितका महान समजतो, तो त्याहून कितीतरी पुढे आहे !

आजच्या काळात गँगस्टर सिनेमांचं भरपूर उत्पादन होतंय, पण 'मालिक' या गर्दीत वेगळी ठरते. ती धडकी भरवणारी, गंभीर आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे राजकुमार रावमुळे थेट काळजात भिडणारी आहे.ही कथा आहे दीपक नावाच्या मुलाची. एका शेतकऱ्याचा मुलगा, जो कॉलेजमध्ये शिकतो आणि वडील शेतात काम करतात. हळूहळू त्याचं जीवन एका अंधाऱ्या गँगस्टर प्रवासात रूपांतरित होतं हीच कहाणी चित्रपट उलगडतो. फिल्मची लांबी योग्य आहे कुठेही ओढूनताणून वाढवलेली वाटत नाही. राजकुमार आणि त्यांच्या पत्नीमधील काही भावनात्मक प्रसंग थोडेसे कमी प्रभावी वाटतात, पण त्या गोष्टी मालिकच्या संपूर्ण प्रवासासाठी महत्त्वाच्या आहेत.राजकुमार राव त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात धाडसी, इमेज-ब्रेकर भूमिका ! डोळ्यांत असलेली ती तीव्रता, इलाहाबादचं बोलीभाषेचं सहज पकडणं अप्रतिम. मानुषी छिल्लर




हिने जबरदस्त सहजतेने अभिनय केला आहे. सौरभ शुक्ला, अंशुमान पुष्कर, स्वानंद किरकिरे आदी सर्वांनी त्यांच्या भूमिकांना योग्य न्याय दिला आहे. प्रोसेनजीत चटर्जी आणि सौरभ सचदेवा: कमी स्क्रीनटाईम असूनही उठून दिसतात. कथा जरी रुटीन वाटली तरी ती सादर करण्याची शैली खूपच प्रभावी आहे. राजकुमार रावचा योग्य आणि प्रभावी वापर दिग्दर्शकाने केला आहे आणि यासाठी त्यांचे कौतुक करायलाच हवं !

मालिक ही कथा आहे एका सामान्य माणसाची  प्रयागराज (पूर्वीचे इलाहाबाद) येथे १९९० च्या दशकात घडणारी ही कहाणी एका अशा तरुणाभोवती फिरते जो फक्त ताकद मिळवण्याच्या हव्यासातून गुन्हेगारीच्या दलदलीत उतरतो. पण हळूहळू सत्ता, रक्तपात आणि फसवणुकीचा खेळ त्याला संपूर्णतः ग्रासतो आणि तो 'मालिक' बनतो.चित्रपटाचा आत्मा म्हणजेच राजकुमार राव. एका शेतकऱ्याच्या मुलाचा एका क्रूर माफियामध्ये होणारा प्रवास त्याने प्रभावीपणे उभा केला आहे. काही दृश्यांमध्ये त्याची संवादफेक आणि भावमुद्रा लक्षवेधी ठरते, तर काही ठिकाणी थोडी कृत्रिमही वाटते.माजी मिस वर्ल्ड मानुषी छिल्लर हिची राजकुमार रावसोबतची ही पहिलीच फिल्म आहे. त्यांची केमिस्ट्री सहज आहे, परंतु ती चित्रपटाला फारसं उचलून धरू शकली नाही. पुलकित यांनी कथा सांगण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे केला आहे. पहिला भाग गुंतवतो, परंतु दुसऱ्या भागात पटकथा थोडी विस्कळीत वाटते. काही प्रसंग परिचित वाटतात, तर काही ठिकाणी कथा गोंधळात जाते. चित्रपटातील गाणी फारशी लक्षात राहणारी नाहीत. पार्श्वसंगीत काही दृश्यांना योग्य ताकद देत नाही, त्यामुळे थराराचा परिणाम कमी होतो. मालिक एक मनोरंजक कथा आहे जी गुन्हेगारी, सत्ता आणि मानवी हव्यासाच्या छायेतून उभी राहते. राजकुमार रावचा अभिनय हा चित्रपटाची जमेची बाजू आहे. तरीही पटकथेमध्ये आणि संगीतात सुधारणा झाली असती, तर हा चित्रपट आणखी मोठा ठरला असता. एक वेळेस पाहण्यासारखा चित्रपट आहे. जर तुम्हाला देसी गँगस्टर कथा आवडत असतील, डोकं चालवणारा अभिनय आणि डायलॉग-हेवी सिनेमे आवडत असतील  तर 'मालिक' तुमच्यासाठी आहे ! विशेषतः राजकुमार रावचे चाहते असाल तर आवर्जून हा सिनेमा नक्की बघाच.




चित्रपट - मालिक

कालावधी: २ तास २९ मिनिटे, दिग्दर्शक: पुलकित

निर्माते: कुमार तौरानी, जय शेवकरमानी

बॅनर : टिप्स इंडस्ट्रीज व नॉर्दर्न लाइट्स फिल्म्स

मुख्य कलाकार: राजकुमार राव, मानुषी छिल्लर, प्रोसेनजीत चटर्जी, हुमा कुरेशी, अंशुमान पुष्कर, स्वानंद किरकिरे, सौरभ शुक्ला रेटिंग :3½ (3.5/5)


***

# फकिरीयत चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित...

**ज्योतिर्मय साहित्य**

फकिरीयत चित्रपट १९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. एक युगपुरुष एक महापुरुष हजारो वर्षांपासून या सृष्टीच्या कल्याणाचे कार्य करीत आहेत. त्यांनी दिलेला योग मानवांसाठी एक दैवी भेट ठरला आहे. हा योग म्हणजेच क्रियायोग. या क्रिया योगाचा अवलंब करून अतिशय कमी काळात मानव आपली उत्क्रांती करू शकतो, अध्यात्मिक मार्गाने पुढे जाऊ शकतो, आयुष्याचं कल्याण करू शकतो. या योगाचे प्रणेते श्री महावतार बाबाजी जे हजारो वर्षांपासून हिमालयाच्या पावन धरतीवर संचार करीत आहेत अशा  रहस्यमय हिमालयीन योग्याची भेट आपल्याला फकिरीयत या आगामी हिंदी चित्रपटात घडणार आहे. १९ सप्टेंबर रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

भद्रबाहू डिव्हाइन क्रिएशन्स एलएलपीच्या बॅनरखाली तयार झालेल्या फकिरीयत या सिनेमाचे दिग्दर्शन संतोष मांजरेकर यांनी केले आहे. मांजरेकर यांनी आजवर बऱ्याच मराठी चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, फकिरीयतच्या







रूपात त्यांनी प्रथमच हिंदी चित्रपट दिग्दर्शित केला आहे. गुरूपौर्णिमेच्या पावन दिवसाचा मुहूर्त साधत फकिरीयतचे नवे कोरे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. या चित्रपटाच्या पोस्टरवर श्री महावतार बाबाजींसोबत श्री स्वामी समर्थ, श्री शंकर महाराज, श्री रामकृष्ण परमहंस, श्री लहिरी महाशय या महान संतांचे फोटोही आहेत. पोस्टरच्या एका बाजूला दोन्ही हात जोडून विनम्र भावनेने उभी असलेली अभिनेत्री दिपा परब दिसते. फकिरीयतच्या निमित्ताने दीपाने हिंदी चित्रपटात पुनरागमन केले आहे. पोस्टरच्या दुसऱ्या बाजूला उदय टिकेकर, संदेश जाधव आणि विनीत शर्मा आहेत. गुरू और शिष्य की कहानी ही चित्रपटाची टॅगलाईन फकिरीयतचा मुख्य उद्देश सांगण्यासाठी पुरेशी आहे. श्री महावतार बाबाजींच्या कार्याची महती फकिरीयतच्या माध्यमातून जगासमोर येणार आहे. फकिरीयत हा चित्रपट एक युगपुरुष, महापुरुष, महावतार बाबाजी व त्यांचा क्रियायोग यांची खरी ओळख सांगणारा आहे. दीपाने साकारलेल्या बाबाजींच्या शिष्येच्या माध्यमातून कथा उलगडणार आहे. हा चित्रपट रसिकांना केवळ आध्यात्मिक अनुभूती देणारा नसून, जीवनाचे सखोल तत्त्वज्ञान सांगणारा आहे. गुरू-शिष्य परंपरेचा अद्भुत वारसा जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणारा आहे. अध्यात्म आणि भक्ती यांचा सुरेख संगम या चित्रपटात घडविण्यात आला आहे. या चित्रपटाची कथा 'चिरुट जलती है' आणि 'अध्यात्म एक विद्रोह, एक क्रांती' या अनुजा जानवलेकर लिखित पुस्तकांवर आधारित आहे. पटकथालेखन अनिल पवार यांनी केले असून, पवार यांनीच अनुजा जानवलेकर यांच्यासोबत संवादलेखनही केले आहे.  फकिरीयत या चित्रपटात दीपा परब सोबत विनीत शर्मा, उदय टिकेकर, अक्षय वर्तक, नयन जाधव, संदेश जाधव, अनुषा सबनीस आदी कलाकार असून संतोष जुवेकर पाहुण्या भूमिकेत दिसणार आहे. समृद्धी पवार यांच्या लेखणीतून अवतरलेल्या गीतांना संगीतकार प्रवीण कुंवर यांनी मनीष राजगिरे, मनोज मिश्रा, जसराज जोशी, नेहा राजपाल यांच्या आवाजात संगीतसाज चढवला आहे. डिओपी अजित रेड्डी यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून संकलन निलेश गावंड यांनी केले आहे.

# प्रिया बापट- उमेश कामत बारा वर्षांनी एकत्र, १२ सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार 'बिन लग्नाची गोष्ट'

**ज्योतिर्मय साहित्य**

'बिन लग्नाची गोष्ट' या आगामी मराठी चित्रपटाच्या माध्यमातून मराठीतील लोकप्रिय आणि लाडक्या जोड्यांपैकी एक प्रिया बापट आणि उमेश कामत हे 'क्युट कपल' तब्बल १२ वर्षांनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र झळकणार आहेत. गेल्या काही वर्षांपासून दोघांचे चाहते त्यांना मोठ्या पडद्यावर एकत्र पाहाण्यासाठी उत्सुक होते आणि अखेर १२ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून त्यांची ही इच्छा पूर्ण होणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आले.




पोस्टरमधील दृश्यामुळे खूप उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रिया हाताची घडी घालून, मिश्कील चेहऱ्याने उभी आहे. निर्णयावर ठाम असल्याचा आत्मविश्वास तिच्या चेहऱ्यावर झळकत आहे. तर उमेश हातात हार घेऊन, डोक्याला मुंडावळ्या बांधून उभा आहे. जणू काही तो लग्नासाठी तयार आहे परंतु, परिस्थिती काहीतरी वेगळी आहे. या सगळ्यांतून स्पष्ट होते की, ही गोष्ट पारंपरिक विवाहसंस्थेच्या बाहेर जाऊन नात्यांची नवी मांडणी करणारी आहे.




चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, ''ही गोष्ट आहे प्रेमाची, नात्यांमधल्या समज गैरसमजांची, वर्षानुवर्षे मनात धरून ठेवलेल्या गाठी सुटण्याची. हा चित्रपट म्हणजे आजच्या काळाचा एक आरसा आहे, ज्यात प्रेक्षकांना स्वतःचं प्रतिबिंब नक्की बघायला मिळेल. काहींना नव्याने प्रश्न पडतील, तर काहींना जुन्याच  प्रश्नांची नवीन उत्तरं मिळतील. हलक्या फुलक्या प्रसंगातून मांडलेली ही गोष्ट प्रेक्षकांचं मनोरंजन नक्की करेल.''

चित्रपटाचे निर्माते नितीन वैद्य सांगतात, ''प्रिया आणि उमेशची केमिस्ट्री प्रेक्षकांसाठी नेहमीच खास असते. इतक्या वर्षांनी ते माझ्या चित्रपटातून एकत्र येत आहेत, याचा मला आनंद आहे. या चित्रपटाची संकल्पना हटके असून ती आजच्या काळाशी थेट संबंधित आहे.''

गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स निर्मित, तसेच तेजश्री अडिगे आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन प्रस्तुत, 'बिन लग्नाची गोष्ट' हा चित्रपट येत्या १२ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. आदित्य इंगळे दिग्दर्शित या 'बिन लग्नाच्या गोष्टी'चे सुनील बियानी, पवन मेहता आणि नितीन प्रकाश वैद्य निर्माते आहेत.

# सगुण-निर्गुण

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या सर्वांना माहिती आहे की नारद  नावाचे एक महान देव ऋषी होते. होते. त्यांचा सर्वत्र मुक्त संचार असे. एकदा असेच ते फिरायला निघाले.  चालत पुढे गेल्यानंतर त्यांना एके ठिकाणी एक माणूस दिसला. तो मागच्या काही जन्मापासून ध्यान मग्न होता. त्यात तो इतका मग्न होता की त्याच्या भोवती मुंग्यांनी वारुळ केले होते.




ते पाहिल्यावर नारद मुनी काही क्षण थांबले  , तेंव्हा त्या ध्यानस्थ व्यक्तिला त्यांच्या आंतरिक शक्तीने नारद  मुनी तेथे आल्याचे समजले, तेंव्हा त्यांनी काही क्षण ध्यान थांबवून नारद मुनींना विचारले,  नारदमुनी तुम्ही  नित्य देवा कडे जात असता, त्यांना माझ्याबद्दल विचारा की  या मुंग्यां पासून  माझी मुक्ती कधी आहे ?नारद मुनी बरं म्हणाले आणि पुढे  चालत गेले.  काही वेळाने त्यांना त्याच  मार्गावर  दुसरा एक व्यक्ति भेटला तो अखंड नाचत होता, उड्या मारत होता, गाणे म्हणत होता.नारदमुनी तेथे बराच वेळ थांबले तेंव्हा त्या व्यक्तिला हे नारदमुनी असल्याचे समजले होते. एक क्षण थांबून त्याने नारदमुनींना विचारले, हे मुनी तुम्ही  नित्य देवाकडे जात असता, तेंव्हा देवाला माझ्याबद्दल विचारा की  मी या अश्या  नाच आणि गाण्यापासून पासून कधी मुक्त होईल?




मी   स्वतःला असे करण्यापासून थांबूच शकत नाही . मी मागच्या काही जन्मापासून असाच करतो आहे. तेंव्हा नारदमुनी बरं म्हणाले  आणि पुढे निघून गेले.  तो दिवस सरला.

दुसऱ्या दिवशी सकाळी नारदमुनी पुन्हा त्याच मार्गाने जात असता ,पहिला ध्यान करणारा व्यक्ति भेटला, त्याने नारदमुनीना विचारले, मुनी तुम्ही देवाला माझ्या या स्थितीतून मुक्ती बद्दल विचारले का? तेंव्हा नारदमुनी म्हणाले, हो, देव म्हणाले की अजून पुढचे चार जन्म अश्याच स्थितीत ध्यान केल्यावर तुला यातून, मुंग्यांच्या वारुळ पासून मुक्ती मिळेल. हे ऐकून ती व्यक्ति खूप नाराज झाली आणि म्हणाली, अरे बापरे?   नारदमुनी म्हणाले दुसरा पर्याय नाही आणि पुढे निघून गेले.

पुढे पुन्हा तो दुसरा व्यक्ति भेटला तेंव्हा त्याने ही नारदमुनीना विचारले, मुनी माझ्या या अखंड नाच आणि गाण्याच्या स्थितीच्या मुक्ती बद्दल देव काय म्हणाले? तेंव्हा नारदमुनी म्हणाले, देव म्हणाले की तुझ्या समोर जे असंख्य पानांनी बहरलेले चिंचेचे झाड आहे, त्याला या क्षणाला जेवढी पाने आहेत, तेवढ्या जन्मानंतर तुझी मुक्ती होईल. हे ऐकून ती व्यक्ति खूप खुश  झाली आणि अत्यानंद होऊन आणखी जोरात नाचू लागली, आणि काही क्षणात थांबून त्या स्थितीतून मुक्त झाली.  खरं तर त्या झाडाला प्रचंड पाने होती, कदाचित असंख्य जन्म घ्यावी लागली असती मुक्तीसाठी, तरी ती व्यक्ति लगेच मुक्त झाली. याचे कारण म्हणजे त्याने दाखवलेली चिकाटी. तेवढे जन्म त्याच स्थितीत  फक्त  राहण्याची  तयारी दाखविली तर तो मुक्त झाला पण पहिल्या व्यक्तिला चार जन्मही खूप कठीण वाटले. अर्थात चिकाटीने  कार्य करण्याची तयारी अणि संयम हे गुण नक्किच अपेक्षित फळ देतात हेच यातून समजून घ्यावे लागेल.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी,  विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559